सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**Government Polytechnic, Aurangabad.**
(An Autonomous Institute of Govt. of Maharashtra)
Osmanpura, Aurangabad - 431005
Phone: (Office) (0240) 2334724 / 2360781 (A.O.) 2345936. (P) 2353644
website: www.gpabad.ac.in
E-mail: : principal.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in

No.GPA/AQAC/EC/212/2022/ 214/15/06/2022 Date : 14/06/2022

## विद्यार्थ्यांना परीक्षांच्या सूचना :

1. परीक्षार्थींनी केवळ पेन, पेन्सिल आणि इरेजर, रूलर, ड्राईंग इन्स्ट्रूमेंट, पारदर्शक लेखन पॅड आणि प्रोग्रामेबल नसलेले कॅल्क्युलेटर यासह सर्व आवश्यक आणि अधिकृत वस्तू परीक्षा हॉलमध्ये न्याव्यात.
2. परीक्षा हॉलमध्ये प्रोग्रामेबल कॅल्क्युलेटर, स्मार्ट घड्याळे, मोबाईल फोनसवर सक्त बंदी आहे. मोबाईल बाळगल्यास परीक्षा विषयक नियमानुसार कार्यवाहीला सामोरे जावे लागते.
3. परीक्षार्थींनी सर्व परीक्षेच्या दिवशी महाविद्यालयीन गणवेश परिधान करावा.
4. परीक्षार्थींकडे त्याचे/तिचे ओळखपत्र आणि परीक्षेचे हॉल तिकीट असावे. अन्यथा त्याला/तिला परीक्षा हॉलमध्ये प्रवेश दिला जाणार नाही.
5. परीक्षार्थींनी परीक्षा सुरू होण्याच्या किमान 30 मिनिटे आधी परीक्षा केंद्रावर (सकाळच्या सत्रासाठी 9.45 a.m.) आणि दुपारच्या सत्रासाठी 1.45 p.m. उपस्थित राहावे.
6. परीक्षेच्या 15 मिनिटे आधी प्रदर्शित होणा-या त्या दिवसांची आसन व्यवस्था परीक्षार्थींनी काळजीपूर्वक पाहावी आणि ज्या इमारतीत त्यांची बसण्याची व्यवस्था केली आहे तेथे जावे.
7. परीक्षार्थींनी परीक्षा सुरू होण्याच्या किमान दहा मिनिटे अगोदर परीक्षा हॉलमध्ये नियुक्त केलेल्या जागेवर बसावे.
8. परीक्षा हॉलमध्ये त्याची/तिची जागा व्यापल्यानंतर, परीक्षार्थ्याने त्याच्या डेस्कच्या आजूबाजूचा परिसर, डेस्कच्या आतील भागात कोणत्याही अनधिकृत साहित्य जसे की पेपरचिट, पुस्तक किंवा कॉपी सामुग्री ज्यासाठी तो/ती परीक्षा देत आहे त्या अभ्यासक्रमाशी संबंधित साहित्य तपासावे. आढळल्यास सुपरवायझर सरांकडे / पर्यवेक्षकांकडे हस्तांतरीत करावे.
9. उत्तरपत्रिका मिळाल्यानंतर उत्तरपत्रिकेवर आसान क्रमांक / नोंदणी क्रमांक लिहिण्यापूर्वी परीक्षार्थीने उत्तरपत्रिका अनुक्रमांक तपासावा. तसेच उत्तरपत्रिका सुस्थितीत असल्याची खात्री करावी. उत्तरपत्रिकेवरील अनुक्रमांक गहाळ किंवा अस्पष्ट असल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील कोणतेही पृष्ठ गहाळ असल्यास किंवा फाटलेले असल्यास ते सुपरवायझर / पर्यवेक्षक यांच्याकडून त्वरीत बदलून घ्यावे.
10. परीक्षेदरम्यान, अनधिकृत साहित्य बाळगणे, साहित्याचा अयोग्य वापर, गैरवर्तन, चर्चा करणे, फसवणूक करणे. अनुचित मार्गाचा अवलंब करणे, तोतयागिरी करणे आणि परीक्षा हॉलमधून साहित्य अनधिकृतपणे काढून टाकणे किंवा पर्यवेक्षकांनी दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्यास परीक्षा नियमानुसार विद्यार्थ्यांना शिक्षा होईल.
11. परीक्षेदरम्यान, विद्यार्थी पर्यवेक्षकांच्या परवानगीने वॉशरूममध्ये तात्पुरता ब्रेक घेवू शकतो. अशा ब्रेक दरम्यान, परीक्षा हॉलच्या बाहेर कोणत्याही अनुचित मार्गाचा अवलंब करणे (इतर विद्यार्थ्यांशी बोलणे देखील) यास्तव विद्यार्थ्यांवर परीक्षा नियमानुसार शैक्षणिक शिस्तभंगाची कार्यवाही होईल.
12. मार्गदर्शक तत्वांनुसार परीक्षकांना प्रति तास अतिरीक्त 15 मिनिटे दिली जातील आणि त्यानुसार परीक्षेचा कालावधी खालीलप्रमाणे असेल.

| अभ्यासक्रमानुसार पेपरचा कालावधी | अतिरिक्त वेळ | परीक्षेचा सकाळचा कालावधी | दुपारच्या सत्राचा कालावधी |
|---|---|---|---|
| 02 Hours | 30 Minutes | 10.00 a.m. To 12.30 p.m. | 2.15 p.m. To 4.45 p.m. |
| 03 Hours | 45 Minutes | 10.00 a.m. To 1.45 p.m. | 2.15 p.m. To 6.00 p.m. |
| 04 Hours | 60 Minutes | 10.00 a.m. To 3.00 p.m. | 2.15 p.m. To 7.15 p.m. |

प्र. प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद.